बातम्या व
जाहिरातीसाठी
संपर्क साधा
* संपर्क *
मो. 9421505122

https://manmadthinagi.com/news

साप्ताहिक
# मनमाड ठिणगी

संस्थापक संपादक : स्व.प्रकाशजी गोयल        संपादक : तुषार गोयल

22k 916
हॉलमार्क सर्टीफाईड
बिनघटीचे दागिने
शुध्दता आणि विश्वास
100%
BIS Approved
Hallmarked Jewellery
कंचन ज्वेलर्स
सराफ बाजार, मनमाड
तुषार गोयल        दिपक गोयल
९४२१५०५१२२        ९९६०९३१४१४

RNI Regd.No.91032/90 (Delhi)   वर्ष ३३ वे   अंक १२ वा.   वार : रविवार दि.११ डिसेंबर २०२२   पाने ४   किमत ५ रू.

## करंजवण मनमाड पाणीपुरवठा योजना; लवकरच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन - आ.सुहास कांदे

मनमाड : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे करंजवण मनमाड पाणीपुरवठा योजनेचा कार्यारंभ आदेश गुरूवार दि.८ रोजी पारित करण्यात आला. मुंबई येथील वर्षा निवासस्थानी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे मनमाड पाणीपुरवठा योजनेची कार्यारंभ आदेश प्रत आमदार सुहास आण्णा कांदे यांच्या मार्फत या योजनेचे कॉन्ट्रॅक्टर ईगल कन्स्ट्रक्शनचे प्रतिनिधी विनय चूक यांच्याकडे सोपवली. याप्रसंगी आमदार सुहास अण्णा कांदे यांच्यासह मतदार संघातील शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. या योजनेमुळे मनमाडकरांचा जिव्हाळ्याचा पाणीप्रश्न या योजनेमुळे कायमचा सुटणार असल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.



नांदगांव तालुक्यातील महत्वाकांक्षी अशा धर्मवीर आनंद दिघे ७८ खेडी जलजीवन योजनेचा कार्यारंभ आदेश महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातर्फे मुख्यमंत्री एकनात शिंदे यांनी आ.सुहास कांदे यांच्या मार्फत ईगल इन्फ्रा इंडिया लि. कंपनीला यावेळी दिला. मनमाडच्या पाणी प्रश्नावर ४० वर्षाहून अधिक काळ राजकारण करण्यात आले. मात्र आ.सुहास कांदे यांच्या माध्यमातून मनमाडचा पाणी प्रश्न मार्गी लागल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

गेले कित्येक वर्षांची मनमाड शहराची पाणीटंचाईचा विषय हा सर्वश्रुत असून आमदार सुहास आण्णा

(पान ३ वर)

## रिपाइंतर्फे जोडे मारो आंदोलन




मनमाड : महात्मा ज्योतिबा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर व कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शाळा उघडण्याकरीता लोकांकडे भीक मागितली, असे महापुरूषांबद्दल बेताल वक्तव्य बिजेपीचे वाचाळ मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केल्यामुळे जनसामान्यांच्या भावना दुखावल्याने रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) तर्फे जोडे मारो आंदोलन करीत चंद्रकांत पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी मनमाड शहर पोलीस निरीक्षक यांना निवेदनाद्वारे करण्यात आली.

पैठण येथे आयोजित कार्यक्रमात जाणीवपूर्वक दोन समाजात तेढ निर्माण व शांततेचा भंग होईल या हेतूने डॉ.बाबासाहेब आंबेडकर,

(पान ३ वर)

## मनमाड शहरामध्ये आमदार चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन





मनमाड : (योगेश म्हस्के) येथे नाशिक जिल्हा कबड्डी असो. आणि नांदगाव तालुका कबड्डी असो. यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर क्रिडांगनावर दि. ९ ते ११ डिसेंबर दरम्यान आमदार चषक अजिंक्यपद आणि निवड चाचणी कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

नाशिक जिल्हा कबड्डी असो. कार्याध्यक्ष राजेंद्र पगारे, प्रमुख कार्यवाह मोहन गायकवाड, रिपाइं नेते गंगादादा त्रिभुवन, रवींद्र घोडेस्वार आदी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते काल ९ डिसेंबर रोजी

(पान ३ वर)

## मनमाडकरांनो भुरट्यांपासून सावधान !

मनमाड (प्रतिनिधी) गेल्या काही दिवसांपासून काही स्त्रिया व पुरूष मागास क्षेत्रात किंवा अशिक्षित भागात जाऊन पितळाचे, तांब्याचे भांडे पॉलीश करून देतो, बदलून देतो म्हणून घरोघरी जाऊन प्रचार करीत आहे. त्यात मोठ्या प्रमाणात काही गरीब नागरिकांचे दागिने लुबाडण्याचे प्रकार घडले आहेत.

याबाबत अधिक वृत्त असे की, शहरातील टकार मोहल्ला व हनुमान नगर भागात काही परगावच्या स्त्रीया ह्या घरोघरी गेल्या व त्यांनी पितळी भांडे, तांब्याचे भांडे, पॉलीश करून बदलून देतो म्हणून सांगत त्यांच्याकडे असलेल्या एका विशिष्ट केमिकल पावडरचा वापर करत काही स्त्रियांच्या गळ्यातील मंगळसुत्र, कानातले दागिने कसलीही खबर न लागू देता लांबविले. विशेष म्हणजे घरात इतर सदस्य असतांना सदर प्रकार घडला. पण काही मिनिटानंतर त्या स्त्रियांची गुंगी उतरल्यानंतर हा प्रकार लक्षात आला आणि एकच रडारड व शोधाशोध सुरू झाली. त्यांचे पै पै गोळा करून हजारो रूपयांचे दागिने डोळ्यांदेखत लंपास झाल्याने त्यांच्याकडे रडण्याशिवाय काहीही उरले नाही. म्हणून समस्त नागरिकांनी आपल्या घरी कोणत्याही अनोळखी इसम येऊन या प्रकारे कसलीही भुलथाप देऊन अमिष दाखवून फायदा करून देण्याची बतावणी करीत असेल तर अशा लोकांपासून सावध रहा व त्यांची पूर्ण चौकशी करा. संशय वाटल्यास पोलीस स्थानकात फोन करा की, काही अनोळ-खी इसम, स्त्रीया आमच्या भागात फिरत आहेत. त्यांच्याकडे एक विशिष्ट केमिकल व पावडर असते तिच्याने ते काही क्षणांसाठी समोरच्याला गुंगीत आणतात व आपल्या मौल्यवान वस्तु घेऊन पसार होतात, यात मनमाड शहर पोलीस ठाण्यानंसुध्दा गंभीरतेने तपास करून शहरात अशा कोणत्या टोळ्या आल्या आहेत त्यांचा तपास करून त्यांना जेरबंद करावे, असे आवाहन मनमाड भाजपाचे सरचिटणीस सराफ सुवर्णकार संघटनेचे सचिव दिपक गोयल यांनी केले आहे.

## Yo!! One bite cafe चे सौ.अंजुम कांदे यांच्या शुभहस्ते उद्घाटन



मनमाड (प्रतिनिधी) : मनमाड शहरातील नागरिकांच्या सेवेत बुधवार दत्त जयंतीच्या शुभ मुहूर्तावर लज्जतदार आणि चविष्ट फास्ट फूड कॅफे चे उद्घाटन नांदगाव तालुक्याचे आमदार सुहास अण्णा कांदे यांच्या पत्नी सौ.अंजुम ताई कांदे यांच्या हस्ते तथा मान्यवरांच्या उपस्थितीत संपन्न झाले. या प्रसंगी उज्वलाताई खाडे, सौ.सविता साईनाथ गिडगे, संगीता बागुल, विद्या जगताप, माजी नगराध्यक्ष साईनाथ गिडगे, राजाभाऊ पगारे, योगेश पाटील, माजी नगरसेवक प्रमोद पाचोरकर, सुनील पाटील, संजय निकम, सादिक भाई पठाण, सुनील गवळी, शेखर जगताप, मामा कटारे, बब्बुभाई कुरेशी, राष्ट्रवादी शहराध्यक्ष दीपक गोगड, जावेद शेख, अमीन पटेल, पिंटू वाघ, युवासेना शहर प्रमुख इरफान शेख, डॉ.निलेश पवार, डॉ.सुहास जाधव आदी उपस्थित होते. सर्व उपस्थितांचे स्वागत संचालक दिपक मकवाने व सौ.कीर्ती दीपक मकवाने, विवेक मकवाने, सौ. सोनाली मकवाने यांनी केले. मनमाड शहरातील नागरिकांनी, बंधू भगिनी, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी कॅफे ला भेट देऊन आस्वाद घ्यावा असे आवाहन दीपक मकवाने यांनी केले आहे.

# मनमाड शहरात महापुरूषांचे पूर्णाकृती पुतळे बसवावेत; रिपाइं तर्फे ढोल बजाव आंदोलन



मनमाड : मनमाड नगरपालिका प्रवेश द्वाराजवळ गुरूवारी सकाळी ११ वाजता नगर पालिका प्रशासनाला जाग आणण्यासाठी रिपाइं तर्फे ढोल बजाव आंदोलन करण्यात आले.

गेल्या अनेक दिवसापासून समस्त मनमाड करांची इच्छा आहे कि, आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसविण्यात यावा. गेल्या अनेक वर्षांपासून या महापुरूषांचा वापर मत घेण्यासाठी होत आहे. तरी आपण लोक भावनेचा आदर करून त्वरित दोन्ही महापुरूषाचे पुर्णाकृती पुतळे १४ एप्रिल पर्यंत बसवावे अन्यथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया तीव्र आंदोलन करण्यात येईल, असे निवेदन नगरपालिका प्रशासन यांना देण्यात आले. यावेळी दिनकर धिवर, दिलीप नरवडे, कैलास अहिरे, गुरूकुमार निकाळे, ॲड.प्रमोद अहिरे व रिपाइं पदाधिकारी उपस्थित होते.

## मनमाड शहरामध्ये श्री दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा



मनमाड : शहरामध्ये श्री दत्त जन्मोत्सव सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. गेल्या सात दिवसांपासून दत्त जयंती निमित्ताने श्री दत्त मंदिर आणि श्री स्वामी समर्थ केंद्र येथे सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. श्री स्वामी समर्थ केंद्र येथे गेल्या सात दिवसांपासून अखंड प्रहारे, श्री गुरूचरित्र, श्री नवनाथ पारायण सेवेकऱ्यांकडून करण्यात येत होते. आज महाआरती, औदंबर प्रदक्षिणा आणि महाप्रसादाचे आयोजन करून सप्ताहाची सांगता करण्यात आली.

श्री दत्त मंदिर येथे ही गेल्या सात दिवसांपासून श्री गुरूचरित्र पारायण, किर्तन आणि भजन सेवा करण्यात येत होती. श्री दत्त मंदिर येथे सायंकाळी सुंदर अशी पाळण्याची आरास करून श्री दत्त जन्म सोहळा साजरा करण्यात आला. या वेळेस शहरातील भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला. गुरू दि.८ रोजी दुपारी काल्याचे किर्तन होऊन भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या प्रसंगी शहरातील भाविक आणि नागरिक या दोन्ही कार्यक्रमांना मोठया संख्येने उपस्थित होते.

## आमदार सुहास कांदे यांनी केले सोनवणे कुटुंबीयांचे सांत्वन



मनमाड : मनमाड येथील एकलव्य नगर येथील लोकेश सुनील सोनवणे या बालकाचा निर्घृण खून करण्यात आला होता. अतिशय हृदयद्रावक घटना माहिती पडताच आमदार सुहास आण्णा कांदे यांनी तत्काळ या कुटुंबीयांची भेट घेऊन पोलिसांना योग्य तपासा करिता सूचना देखील केल्या होत्या. दोन तासात पोलीस अधिकाऱ्यांनी आरोपीस अटक केली आहे.

दि.५ रोजी आमदार सुहास आण्णा कांदे व सौ.अंजुमताई कांदे यांनी सोनवणे कुटुंबीयांची भेट घेतली. घडलेल्या घटनेबाबत दु:ख व्यक्त करत आपण सदर घटना गंभीर असून सदर केस फास्टट्रॅक मार्फत चालवण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. सोबतच उज्वल निकम सारख्या दर्जेदार वकिलांना या केसचे काम पहावे म्हणून प्रयत्न करणार असल्याचे सांगत आरोपीस फक्त आणि फक्त फाशीचीच शिक्षा होईल, असा पाठपुरावा करेन हा शब्द सोनवणे कुटुंबीयांना दिला. सोनवणे कुटुंब हे कष्टकरी वर्गातील असून परिस्थिती अत्यंत नाजूक असल्याकारणाने या वेळी सौ.अंजुमताई कांदे यांनी मुलाच्या आईकडे रोख एक लाख रूपये सुपूर्द केले तर चार महिने पुरेल असा किराणा, तांदुळ गहू अशी सामुग्री दिली.

स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांनी तात्काळ या घटनेच्या आरोपीला शोधून काढल्याबद्दल त्यांचे कौतुक यावेळी आमदार यांनी केले. याप्रसंगी तहसीलदार सिध्दार्थ मोरे, डीवायएसपी समीरसिंग साळवे तसेच एपीआय पी.बी.गिते, मुख्याधिकारी सचिनकुमार पटेल उपस्थित होते. तालुका प्रमुख साईनाथ गीडगे, शहरप्रमुख मयूर बोरसे, ज्येष्ठ नेते राजाभाऊ भाबड, जिल्हा उप प्रमुख सुनील हांडगे, आमीन पटेल राकेश ललवाणी, महीला आघाडीच्या उपजिल्हा प्रमुख उज्वला खाडे, तालुका प्रमुख विद्या जगताप, शहरप्रमुख संगीता बागुल, पूजा छाजेड, वंदना शिंदे, राधाबाई मोरे, सुभाष माळवतकर, दिनेश घुगे, गुलाब जाधव, काळू माळी, गोकुळ परदेशी, लाला नागरे, आप्पा आंधळे, दादा घुगे, लोकेश साबळे, मुकुंद झाल्टे, मिलींद पाथरकर, अज्जू शेख, सिध्दार्थ छाजेड, आजिंक्य साळी, सचिन दरगुडे, आनंद दरगुडे, ललीत रसाळ शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, संपादक, प्रकाशक, तुषार प्रकाश गोयल यांनी शार्प ऑफसेट, मालेगांव येथे छापून पूनम पब्लिसिटी गोयल बिल्डींग, मनमाड ४२३ १०४, जिल्हा नाशिक येथे प्रसिध्द केले. मो.९४२१५०५१२२ (मनमाडच्या न्यायकक्षेत) **संपादक : तुषार प्रकाश गोयल**

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याचे सुशोभिकरण करा - सकल मराठा समाज



मनमाड : छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धकृती पुतळ्याचे सुशोभिकर करा, अन्यथा सोमवार दि.१२ पासून आमरण उपोषण करण्याचा इशारा सकल मराठा समाजातर्फे न.पा.मुख्याधिकारी यांना निवेदन देवून देण्यात आला.

निवेदनात म्हटले आहे की, महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले श्री छत्रपती शिवजी महाराज यांचा मनमाड येथे गेल्या कित्येक वर्षापासून अर्धकृती पुतळा प्रस्थापित झालेला आहे. जेव्हापासुन महाराजांचा अर्धकृती पुतळा प्रस्तापित झालेला आहे, तेव्हापासून आजपर्यंत या पुतळ्याच्या सुशोभिकरणा विषयी मनमाड नगर परिषदेमार्फत लक्ष दिले गेलेले नाही. या याबाबत पालिकेने कोणत्याही प्रकारचे काम केलेले नाही. गेल्या १० ते १५ वर्षापासून अनेक संघटनांनी व त्यांचे कार्यकर्ते यांनी महाराजांच्या पुतळ्याच्या सुशोभिकरणाबाबत मागणी करून निवेदने दिली असून देखील पालिकेकडून त्यास प्रति उत्तर म्हणून फक्त आश्वासनेच मिळाली. प्रत्यक्षात कृती झालेली नाही.

मागील शिवजयंतीला, दि.१२ फेब्रुवारी २०२२ ला सांगितले गेले की, येत्या चार महिन्यात महाराजांच्या पुतळयाचे सुशोभिकरणाचे काम पूर्ण होईल. यासाठी नाशिकच्या शिवभक्ताला याविषयीचे डिझाइन व आराखडा करून देण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. परंतु चार महिने होऊन देखील याबाबत पालिकेतर्फे प्रशासनाने कोणत्याही प्रकारचे टेंडर पास केलेले नाही व सुशोभिकरण्याच्या कामास सुरूवात केलेली नाही.

महाराजांची जयंती जवळ येत आहे तरी याबाबत प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसेल व आख्या महाराष्ट्राचे दैवत असणाऱ्या महाराजांच्या विषयी असे राजकारण होत असेल तर याच विषयाचा राग, संताप मनमाडमधील सर्व शिवभक्त यांना आहे. सर्व शिवभक्त याविषयी सुशोभिकरणाचे काय झाले असा प्रश्न करीत आहेत. परंतु पालिकेमार्फत या लोकप्रतिनिधीमार्फत याबाबत कोणतेही पाऊल उचलले जात नसल्यामुळे नाना आबाजी शिंदे व विष्णु शंकर चव्हाण सोमवार दि. १२ /१२/ २०२२ रोजी श्री छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळयाचे सुशोभिकरण होत नाही तोपर्यंत आमरण उपोषणाला बसणार आहे. जर प्रशासनाने याबाबत दखल घेतली नाही तर त्यावेळी होणाऱ्या परिणामांस मनमाड नगर पालिका जबाबदार असेल याची प्रशासनाने नोंद घ्यावी. असे निवेदन नगरपालिका कार्यालीन अधिक्षक सकल मराठा समाजातर्फे श्री.पाईक यांना देण्यात आले. यावेळी राष्ट्रवादी कॉंग्रेस मनमाड शहर कार्याध्यक्ष नाना शिंदे, भीमराज लोखंडे, विष्णू चव्हाण व सकल मराठा समाज पदाधिकारी उपस्थित होते.

## डॉ.आंबेडकर विद्यार्थी आश्रमला धान्य पुरवठा करण्याची राष्ट्रवाची मागणी



मनमाड : डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी आश्रम कल्याणकारी संस्था व वसतीगृह योजनेअंतर्गत धान्याची तात्काळ उपलब्धता करण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी मनमाड शहराच्या वतीने तहसीलदार नांदगांव यांच्याकडे निवेदन सादर करत करण्यात आली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यार्थी आश्रम मनमाडची स्थापना १९४७ साली झाली झाल्यापासून तेथे ग्रामीण भागातील गरीब विद्यार्थी शिक्षणासाठी राहतात. या या वसतीगृहात समाजकल्याण जि.प.न.नाशिक यांची २४ मुलांची मान्यता आहे. आम्ही आपणास विनंती करते की, कृपया या वसतीगृहास योजनेअंतर्गत धान्याचा पुरवठा सुरू करण्यात यावा जेणे करून गरिब विद्यार्थ्यांना शिक्षण सुरू ठेवणे शक्य होईल. या मागणीची तत्काळ दखल न घेतल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे. निवेदनावर दिपक गोगड, प्रकाश बोधक, अमोल काळे, अक्षय देशमुख, राजेंद्र जाधव, हबीब शेख, श्रीराज कातकडे, आनंद बोधरा, श्रीराज कातकडे यांच्या सह्या आहेत.

## अविष्कार विद्यापीठ स्तरीय संशोधन स्पर्धेसाठी मनमाड महाविद्यालयाच्या संशोधन प्रकल्पाची निवड



मनमाड : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठांतर्गत विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती वाढविण्या साठी संशोधन स्पर्धा राबवली जाते. या अंतर्गत दिनांक ५ डिसेंबर २०२२ रोजी जिल्हास्तरीय आविष्कार स्पर्धेचे नाशिक येथे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत महात्मा गांधी विद्यामंदिर संचलित कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड च्या संशोधक प्रकल्पाची विद्यापीठ स्तरावर स्तुत्य निवड झालेली आहे. प्युअर सायन्स विभागात प्रज्ञा विंचू, नेहा पठाडे, सुचिता बगदाने, वैष्णवी दराडे (पदव्युत्तर, रसायनशास्त्र विभाग) यांच्या संशोधन प्रकल्पाची निवड झालेली आहे. विद्यापीठ स्तरीय निवड झालेल्या प्रकल्पांची पुढील स्पर्धा दिनांक १३ डिसेंबर २०२२ रोजी जाधव क्रीडा संकुल सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे येथे होणार आहे. या स्पर्धेतील सर्व यशस्वी विद्यार्थी तसेच महाविद्यालयातील एआरसी समन्वयक प्रा. डॉ.जेडी वसईत, विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक प्रा.रोहित शिंदे, डॉ.राहुल शिंदे, विभागप्रमुख डॉ.बी. एस. देसले, या सर्वाचे महात्मा गांधी विद्यामंदिर संस्थेचे जनरल सेक्रेटरी, समाजश्री डॉ. प्रशांतदादा हिरे, मा.शिक्षक आमदार संस्थेचे समन्वयक डॉ.अपूर्वभाऊ हिरे, डॉ.अद्वय आबा हिरे-पाटील, विश्वस्त व जनसंपर्क प्रमुख मा.संपदादीदी हिरे, संस्थेचे उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. हरीष आडके, सहसचिव डॉ.व्ही. एस. मोरे, महाविद्यालयीन विकास समितीचे संस्था प्रतिनिधि प्राचार्य. डॉ. बी .एस. जगदाळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए. व्ही पाटील, उपप्राचार्य डॉ.पीजी. आंबेकर यांनी अभिनंदन करून पुढील स्पर्धे साठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## ✲ पान १ वरून ✲ हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे करंजवण मनमाड पाणीपुरवठा योजनेचा कार्यारंभ आदेश पारित

कांदे यांनी हा प्रश्न कायमचा सोडवण्यासाठी जिकीरीचे प्रयत्न केले. संबंधित प्रत्येक शासकीय खात्यांकडे सतत योजनेसंदर्भात पाठपुरावा केला. योजनेसाठी येणाऱ्या विविध अडथळ्यांना तोंड देत आमदार सुहास कांदे यांनी योजनेच्या यशस्वीतेसाठी लागेल तो प्रयत्न केला. अखेर आज मनमाडकर माता भगिनींच्या स्वप्नपूर्तीचा सुवर्ण दिवस ठरला असून करंजवण मनमाड पाणीपुरवठ्याचा कार्यारंभ आदेश पारित मनमाडकर व्यापारी, जनतेसाठी, माता भगिनीं साठी उज्वल भविष्याचा हा संकेत आहे. सदर योजनेचा शासकीय कालावधी ३० महिन्यांचा असून आमदार सुहास कांदे यांनी हेच काम १७ ते २० महिन्यात पूर्ण करून घेणार असल्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

आमदार सुहास अण्णा कांदे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे आणि आता लवकरच करंजवण मनमाड पाणीपुरवठा योजनेच्या कामाचे भूमिपूजनही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते मनमाड येथे लवकरच संपन्न होणार आहे. मनमाड शहराचा पाणी प्रश्न मार्गी लावत असतानाच आमदार सुहास कांदे यांनी मनमाड शहरात उद्योग व्यवसायाला चालना मिळावी म्हणून एमआयडीसी साठी प्रयत्न चालू ठेवले आहेत आणि पाण्याची उपलब्धता होण्याआधीच एमआयडीसी साकारण्याचा निर्धार त्यांनी केला आहे. लवकरच एमआयडीसी निर्मितीबाबत घोषणा करणार असल्याचीही शक्यता आहे. मतदार संघात चौफेर पाणी योजना मंजूर करून आमदार सुहास कांदे यांनी संपूर्ण मतदारसंघात येत्या काही महिन्यात प्रत्येक नागरिकाच्या जीवनातील प्रमुख गरज म्हणजे पाणी उपलब्ध करून देण्याचा शब्द खरा करून दाखवला आहे.

याप्रसंगी उपस्थितांमध्ये शिवसेना उपजिल्हाप्रमुख सुनील हांडगे, संग्राम बच्छाव, महेंद्र दुकळे, राजाभाऊ भाबड, तालुका प्रमुख साईनाथ गिडगे, पंकज निकम, मनमाड शहर प्रमुख मयूर बोरसे, भाजपा जिल्हा संघटक नितीन पांडे, शहर प्रमुख जय फुलवाणी, युवा सेना जिल्हाप्रमुख फरहान खान उपजिल्हाप्रमुख सुरेश शेलार, ज्ञानेश्वर कांदे, धनंजय कांदे, महावीर ललवाणी, भरत पवार, आबा देवरे, नारायण पवार, एकनाथ बोडके, महेश बोराडे आदी उपस्थित होते.

## मनमाडमध्ये आमदार चषक कबड्डी स्पर्धेचे आयोजन

या स्पर्धेचे उद्घाटन होऊन सुरवात झाली असून उद्या दि.११ डिसेंबर रोजी स्पर्धेचा समारोप होणार आहे. या स्पर्धेत एकुण ४८ पुरूष आणि १४ महिला संघ सहभागी झाले असून ६० परूष तर २० महिला असे एकूण ८० सामन्यांचा थरार क्रीडाप्रेमींना अनुभवता येणार आहे. या स्पर्धेमधुन एकूण २२ खेळाडूंची निवड होणार असून यातील १२ खेळाडूंना राज्य अजिंक्यपद चाचणी कबड्डी स्पर्धेमध्ये नाशिक जिल्हा कबड्डी संघामध्ये खेळण्याची संधी मिळणार आहे. या कबड्डी स्पर्धेला शहरातील क्रिडा प्रेमींची देखील पसंती मिळत असून स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजन समितीचे सदस्य रमेश केदारे, राजु डमरे, वाल्मीक बागुल, विलास मोरे, शाकिर शेख, रेहमान शेख आणि नाशिक जिल्हा व नांदगाव तालुका कबड्डी असो. सर्व सदस्य, पंच मंडळ परिश्रम घेत आहे.

## रिपाइंतर्फे जोडे मारो आंदोलन

महात्मा ज्योतिबा फुले, कर्मवीर भाऊराव पाटील या महापुरूषांनी भीक मागून शाळा उघडल्या, असे बेताल वक्तव्य खुद्द उच्च व तंत्रज्ञान शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केल्याने समस्त महाराष्ट्राचा अपमान आहे असे वक्तव्य करून त्यांनी त्यांची अल्पबुध्दी दाखवून दिली. अशा मंत्र्यांची महाराष्ट्राला गरज नाही. बेताल वक्तव्य करून युवापीढी देशोधडीला लागेल. असा शिक्षणमंत्री त्वरित हटविण्यात यावा या मागणीसाठी रिपाइंतर्फे जाहीर निषेध करण्यात येवून चंद्रकांत पाटील यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. निवेदनावर रिपाइं मनमाड शहर अध्यक्ष दिलीप नरवडे, नांदगांव ता.अध्यक्ष कैलास आहिरे, उत्तर महाराष्ट्र कार्याध्यक्ष दिनकर धिवर, नांदगांव तालुका अध्यक्ष गुरूकुमार निकाळे, शहर सचिव ॲड.प्रमोद अहिरे, युवा नेते मोतीष चाबुकस्वार, सागर केदारे, बाळासाहेब खरे, सुनिल बागुल, बबलु घोडके, चांगदेव संसारे, पंकज तायडे, मणी उबाळे, आकाश वाघमारे, दिनकर कांबळे, धनंजय अवचारे, महिला आघाडीच्या कमल खरात, मंदा भोसले, कुसुम दहिवले, मिना गांगुर्डे, अरूणा जाधव, जिजाबाई जाधव आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

## राज्यस्तरीय शालेय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी मनमाडच्या आठ वेटलिफ्टिंग खेळाडूंची निवड



मनमाड : रावेर जिल्हा जळगाव येथे संपन्न झालेल्या नाशिक जळगाव धुळे नंदुरबार या चार जिल्ह्यातील खेळाडूंच्या वेटलिफ्टिंग स्पर्धेत मनमाडच्या जयभवानी व्यायामशाळेच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी करीत स्पृहणीय यश संपादन केले.

पूर्वा दीपक मौर्य, सरस्वती विद्यालय, दिव्या उपेंद्र सोनावणे, छत्रे विद्यालय, श्रावणी विजय पुरंदरे, छत्रे विद्यालय, श्रावणी वाल्मिक सोनार छत्रे विद्यालय, आनंदी विनोद सांगळे, छत्रे विद्यालय, पूजा श्याम वैष्णव व साक्षी भाऊसाहेब वानखेडे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय मनमाड, करिष्मा रफिक शाह न्यू इंग्लिश स्कुल नगरसुल या खेळाडूंनी आपापल्या वजनी गटात प्रथम क्रमांक पटकावला व कुडाळ सिंधुदुर्ग येथे होणाऱ्या शालेय १७ व १९ वर्षे मुलींच्या राज्यस्तरीय वेटलिफ्टिंग स्पर्धेसाठी नाशिक विभागीय संघात स्थान मिळविले.

कृष्णा संजय व्यवहारे गुड शेफर्ड स्कुल, साक्षी राजाराम पवार, आयुष बाळू देवगीर, साहिल यादवराव जाधव, ध्रुव केशव पवार, अथर्व चारूदत्त कारंडे, छत्रे विद्यालय, साक्षी संतोष आहेर सरस्वती विद्यालय, वैष्णवी अतिश शुक्ला मध्य रेल्वे मा.विद्यालय यांनी द्वितीय क्रमांक पटकावला तसेच अनिरूध्द देवेंद्र अडसुळे याने चुरशीच्या स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळविला.

यशस्वी खेळाडूंना छत्रे विद्यालयाचे क्रीडा प्रशिक्षक प्रविण व्यवहारे, आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक तृप्ती पाराशर यांचे मार्गदर्शन लाभले आहे. जय भवानी व्यायामशाळेचे अध्यक्ष डॉ. विजय पाटील, मोहन अण्णा गायकवाड, डॉ.सुनील बागरेचा, प्रा.दत्ता शिंपी, कला विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय मनमाड चे प्राचार्य डॉ.अरूण पाटील, क्रीडा संचालक प्रा.संतोष जाधव, छत्रे विद्यालयाचे आधारस्तंभ पी.जी. धारवाडकर, अध्यक्ष पी.जे.डिंडोरकर, सचिव दिनेश धारवाडकर, संचालक नाना कुलकर्णी प्रसाद पंचवाघ, मुख्याध्यापक आर.एन.थोरात, उपमुख्याध्यापक देशपांडे, एस.व्ही.पर्यवेक्षिका सौ.पोतदार एस.एस.यांनी अभिनंदन केले.


### पाहिजेत

साप्ता.मनमाड ठिणगी तसेच ठिणगी न्यूज पोर्टल माध्यमांचे प्रतिनिधी तसेच जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहेत.
वृत्तपत्र क्षेत्रातील अनुभवी उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
**दिपक गोयल** (जाहिरात व्यवस्थापक)
सराफ बाजार, मनमाड-
मो.९९६०९३१४१४

BIS 100% Hall Marked Jewellery

आमच्याकडे कोणतेही BIS प्रमाणित ९१६ हॉलमार्क दागिने मोडताना घट येत नाही.

**कोणत्याही आणि कोणाच्याही भूलथापांना बळी पडू नका.**

✲ हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी करणे नुकसानदायक आहे.
✲ हॉलमार्क नसलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणुक होऊ शकते.
✲ 916 22 K हॉलमार्क दागिने KDM2-LOY पासून बनलेले असतात त्यांना डाग नावाचा प्रकार नसतो.
✲ फक्त 916 22 K मार्किंग म्हणजे हॉलमार्क नसतो. त्यावर BIS चा लोगो सुध्दा असला तरच तो दागिना ओरिजनल हॉलमार्क असतो.
✲ BIS हॉलमार्क दागिने खरेदी करण्याचे फायदे.
✲ हॉलमार्क असलेले दागिने खरेदी केल्यामुळे सोन्याच्या शुध्दतेत फसवणूक होत नाही.
✲ भारत सरकार प्रमाणित लॅबमध्ये दागिन्यांची पारख होते व दागिना शुध्द असेल तरच त्याच्यावर हॉलमार्किंग केली जाते.
✲ BIS 916 22 K हॉलमार्क दागिने मोडतांना कसलीही डागाची घट कापली जात नाही.
✲ हॉलमार्क सोन्याच्या दागिन्यांना मजुरी ही प्रती ग्रॅममागे लागते. ती ही कॅरेट च्या योग्य भाव प्रमाणे. आणि तीच आधी समजावून घ्या. शंका असल्यास आम्हाला संपर्क करा.
✲ २० कॅरेट, २२ कॅरेट हॉलमार्क सोन्याचे भाव आणि २३ कॅरेट, २४ कॅरेटसोन्याचे भाव हे हे वेगवेगळे असतात.
✲ नवीन हॉलमार्क सक्तीचे कायदे हे ग्राहक हितासाठीच बनलेले आहेत.
✲ साध्या (estimate, qotation लिहिलेले) पावतीवर व्यवहार केल्यास तुमची फसवणूक अटळ आहे. GST चे पक्के बिल मागून घ्या.
✲ दागिने खरेदी खरेदी केल्यावर GST चे पक्के बिल मागून घ्या आणि ते मिळत नसेल तर तेथून दागिने खरेदी करू नका. अन्यथा तुम्ही फसवले जाऊ शकता.
✲ तुमचे याआधी खरेदी केलेले दागीने सुध्दा योग्य भावाप्रमाणे मोडले जाऊ शकतात ते मोडता येणार नाही. घट जास्त येईल. कमी भाव मिळेल हा अपप्रचार केला जात आहे.
✲ जुने दागीने हॉलमार्कचे नसतील तरीही त्यांची किंमत कमी होत नाही हे लक्षात ठेवा.
✲ रोजचे सोने-चांदीचे भाव जाणून घेण्यासाठी आम्हास संपर्क करा.



**कंचन ज्वेलर्स**
४५७, सराफ बाजार, मनमाड

**दिपक गोयल**
सचिव : सराफ सुवर्णकार असो. मनमाड
सरचिटणीस : भाजपा मनमाड शहर
मो.9960931414


मनमाडकरांच्या सेवेत दाखल....
वातानुकुलीत,
संगितमय,
चविष्ट,
रूचकर आणि
लज्जतदार
फास्ट फुड
पदार्थांची
मेजवाणी
YO!!
PURE VEG.
II SHRI II
One Bite
Cafe
TASTY FAST FOOD WITH DESI TADKA...
Mob.9028878999
प्रोप्रा.दिपक मकवाणे
साई सिटी सेंटर मॉल
मालेगांव नाका, शॉप नं.१३, मनमाड


आमचे असंख्य ग्राहक, हितचिंतक व मित्र परिवारास
'नाताळ व नूतन वर्षाच्या हार्दिक शुभेच्छा !
नाताळ-नूतनवर्ष
धमाका ऑफर
रु.3000 च्या पुढील खरेदीवर मिळवा मोफत कुपन आणि
लकी ड्रॉ द्वारे आकर्षक बक्षिसे जिंकण्याची सुवर्णसंधी...!
सोने-चांदी दागिने खरेदी सोबतच
आकर्षक बक्षिसांची लयलुट...
प्रथम बक्षिस
XIAOMI (40inch) अँनरॉईड LED टि.व्ही.
द्वितीय बक्षिस
Vivo (6/128GB) मोबाईल फोन
तृतीय बक्षिस
Whirlpool (190ltr.) फ्रिज
चतुर्थ बक्षिस
XIAOMI (32 inch) अँनरॉईड LED टि.व्ही.
पाचवे बक्षिस
LG (7Kg.) वॉशिंग मशिन
सहावे बक्षिस
Crompton (550w) मिक्सर - ५ नग
सातवे बक्षिस
Noise (1.69" Display) स्मार्ट वॉच- ५ नग
आठवे बक्षिस
Cello (18 pcs.) किचन सेट - ५ नग
नववे बक्षिस
Boat Rockerz हेडफोन्स - ५ नग
दहावे बक्षिस
Esquire Palstic टि-टेबल - ५ नग
अकरावे बक्षिस
लगेज ट्रॉली बॅग ५० नग
मग विचार कसला...यंदा सणानिमित्त संधी आहे...
खरेदीची आणि लकी ड्रॉ द्वारे बक्षिसे जिंकण्याची...
* हॉलमार्क दागिने
* कोणतेही छुपे कर नाही
* पारदर्शक व्यवहार
* योग्य भाव व मजुरी
शुध्दता आणि विश्वासाची वैभवशाली परंपरा
कंचन ज्वेलर्स
सराफ बाजार, मनमाड, मो.९४२१५०५१२२, ९९६०९३१४१४